Literacy for a Billion

Movie: Padchaya
Year: 1964

Song: Uth Shankara Sod Samadhi
Lyricist: G. D. Madgulakar

ऊठ शंकरा सोड समाधी
ऊठ शंकरा सोड समाधी
वनात आला आला मदन पारधी
ऊठ शंकरा सोड समाधी
ऊठ शंकरा सोड समाधी
ऊठ शंकरा

पंचशरांनी भाता भरूनी
पंचशरांनी भाता भरूनी
पंचशरांनी भाता भरूनी
ऊभारतिपती माझ्या नयनी
माझ्या नयनी
पुष्प धनुष्या....
पुष्प धनुष्या करी सरसावुनी
करी सरसावुनी
अचूक तुझ्या तो हृदया भेदी...
ऊठ शंकरा सोड समाधी
ऊठ शंकरा

सप्तस्वरांची झडवित नौबत
निनांकीत ध्वज मिरवित मिरवित
सप्तस्वरांची झडवित नौबत
निनांकीत ध्वज मिरवित मिरवित
जवळी ये रथ आला मन्मथ
जवळी ये रथ आला मन्मथ
सखे तयाशी सविनय साधी...
ऊठ शंकरा सोड समाधी
ऊठ शंकरा सोड समाधी
वनात आला आला मदन पारधी
ऊठ शंकरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*